# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ३६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०१/०७/२०१६.

**१) जेवणामध्ये विष घालुन जिवानिशी ठार केले. :—**

दिनांक २९/०६/०१६ रोजी १७.०० वा. पुर्वी फिर्यादी मोतीराम दाजीबा राऊत वय ६४ वर्ष, रा. पळसपाणी हा मृतकचा वडील असुन मृतक वय २८ वर्ष हा आरोपी महिलेचा पती आहे. मृतक व आरोपी यांचा विवाह ११ मे २०१६ ला झाला तेव्हा पासुन आरोपी हीला तीचा पती हा पसंत नाही असे म्हणुन शुल्लक कारणा वरून भांडण करीत असे, याच कारणावरून आरोपीने तिच्या पतिला जेवनामध्ये विष घालुन जिवानीशी ठार केले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून व मर्ग क्र. ४३/१६ कलम १७४ जाफौ चे मर्ग चे चौकशी वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०२ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. खंडाते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) विवाहितेचा पैश्यासाठी शारीरिक व मानसिक छळ. :—**

दिनांक २५/०६/०१६ ते ३०/०६/०१६ चे आजपावेतो चारही आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी महिला हिला ''तु आपल्या वडीलाच्या घरुन पैसे आण.'' असे म्हणुन भांडण केले व लाथाबुक्यानी तोंडावर, शरीरावर मारपीट करुन तिला शारीरीक व मानसीक त्रास दिला व वाईट—वाईट शिवीगाळ करुन जिवानीशी मारण्याची धमकी दिली. असे डॉक्टरी रिपार्ट व एक्सरे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वरठी येथे अप. क्र. ००/१६ कलम ४९८(अ),३२५,५०४,५०६,३४ भादंवीचे कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ),३२५,५०४,५०६,३४ भादंवी अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) शुल्लक कारणावरून लाकुड कापण्याच्या आरीने मारून जखमी केले. :—**

दिनांक २९/०६/०१६ रोजी १८.०० वा. दरम्यान फिर्यादी रामकिसन सुका उपरीकर वय ५२ वर्ष, रा. टेंभणी याने आरोपीला ''माझ्या खताचे पैसे का देत नाही.'' असे हटकले यावरून आरोपीने फिर्यादीला ''तुला मागायची तमीज आहे का.'' असे बोलुन भांडण केले व लाकुड कापण्याच्या आरीने फिर्यादिच्या मानेवर उजव्या बाजुला मारुन जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंडेकर पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) मातोश्री कापड दुकानातुन कपडयांची व नगदी पैश्याची चोरी. :—**

दिनांक २९/०६/०१६ रोजी २१.०० वा. ते दि. ३०/०६/०१६ रोजी ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी दिवाकर दशरथ बोरकर वय ४५ वर्ष, रा. जांब हे त्यांच्या मातोश्री कापड दुकानाच्या शटरला ताले लावुन बंद करुन घरी गेले व दिनांक ३०/०६/२०१६ ला ०९.०० वा. दरम्यान दुकान उघडण्यास आले, तेव्हा त्यांना दुकानाचे ताले तुटलेले दिसले. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन शटरचा ताला तोडुन आत प्रवेश केला व दुकानातील ३४ साडया व ११ जिन्स

पॅन्ट व नगदी २६,५००/—रु. असा एकुण कि. ५०,०००/—रु. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटिंग पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक ३०/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, गोबरवाही, साकोली, तुमसर व पवनी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५४ लिटर हातभट्टी दारू कि. ८५१०/—रू. व ४ लिटर २०० मिली. देशी दारू + इंग्रजी दारू + स्कॉरपीओ गाडी कि. ३,०१,८७५/—रू. तसेच जुगारातुन कि. १२२/—रू. असा एकुण कि. ३,१०,५०७/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.